International Journal of Researches in Social Science and Information Studies (IJRSSIS)
January 2015
Volume-I , Issue-III
Online Journal
ISSN No. 2347-8268

# सांसदीय नेतृत्त्व आणि अभ्यासपूर्ण वक्तृत्त्व डॉ. आबासाहेब उर्फ गोपाळराव बाजीराव खेडकर

**डॉ. संगीता एस. भुयार (राज्यशास्त्र विभाग)**
या.द.व.देशमुख कला व वाणिज्य महाविद्यालय, तिवसा, जि.अमरावती.

---

**प्रस्तावना—**

भारतामध्ये ब्रिटीशांची राजवट होती तेव्हा आधुनिक उद्योगधद्यांची स्थापना केली गेली. त्यामुळे मजूर वर्गाची संख्या अधिकाधिक वाढत गेली. जेवढी मजूरी त्याला मिळत होती त्यावर त्यांच्या परिवाराचा उदरनिर्वाह होत नव्हता. श्रीमंत विरूद्ध गरीब वर्ग लढ्याशिवाय १६ व्या शतकाच्या शेवटच्या दशकात सतत दुष्काळ पडले.

''१८६७, १८६६ आणिी १६०० मधला दुष्काळही भभयंकर तीव्र होता''.१ महात्मा फुले यांनी इ.स. १८८३ मध्ये शेतकज्यांचा आसूड या नावाचा ग्रंथ लिहून त्यांच्या दुखाचा मार्ग समोर मांडला. शेतकज्यांच्या मुलांना प्राथमिक शिक्षण मिळावे त्यांना प्रोत्साहन मिळविण्यासठी वसतीगृहे स्थापन करावे. शेतकज्यांच्या मूलांनी व्यावसायिक शिक्षण द्यावे. ''शेतकरी हा समाजाचा घटक असून त्यांच्या कष्टावरच समाजाची उपजिविका होते हे फुलेंनी ओळखले होते''.२ देश म्हणजे काय नि कोणाचा? हा फुल्यांच्या मुलभूत प्रश्न आबासाहेबांच्या मनात उभा होता. आबासाहेबांनी राजकारणामध्ये सर्वसामान्यांच्या विकासाचा ध्यास घेतलेला आणि शेवटपर्यंत सर्वसामान्यांच्या दृष्टीकोनातून कार्यरत राहीले. आबासाहेबांनी निवडून आल्यानंतर जनतेच्या विश्वासाला तडा न जाऊ देण्यासाठी संघर्ष केला. जनसामान्यांच्या हितासाठी जनतेच्या महत्त्वपूर्ण प्रश्नांवर त्यांनी लक्ष वेधले.

''शिक्षण खात्याच्या ग्रँटवरील कपात— याबाबत आबासाहेबांनी चालू सालच्या (१६४६) शिक्षण खात्याच्या अंदाजपत्रकात युनिव्हरसिटी कॉलेज व सेकंडरी शिक्षणाकरिता पट लक्षावर खर्च होणार आहे. पण प्राथमिक शिक्षणाकरिता वाढते हे सरकारच्या लक्षात आणून देवून सरकारने शे. ११ वरून निदान शेकडा ५० वर नेण्याची योजना आखावी अशी जनतेची अपेक्षा होती.''३



A Four-monthly Journal By
Vishwashanti Multipurpose Society,
(Global Peace Multipurpose Society)

''ग्रामपंचायती बिलावर आबासाहेब बोलले की, ग्रामपंचायतीच्य कायदा लागु करण्यात आला आहे. परंतु आजही पाचशे हजार वस्ती असलेली गावे अशी दाखविता येतील की त्यांना नरककुंडाचे स्वरुप प्राप्त झाले तेव्हा ग्रामसुधारणेत गावाची सफाई करण्याची व्यवस्था सरकारने प्रथम केली पाहिजे. खेड्यांच्या सुधारणेकडे आबासाहेबांनी सरकारचे लक्ष वेधले.''४

''जिल्हा कॅन्सिलच्या अधिकारात कपात करण्याच्या प्रश्नांवर आबासाहेबांनी विरोध करून या संस्थांनी शिक्षणाचा प्रसार किती आला आणि शिक्षणाचे प्रमाण किती वाढविले हे निदर्शनास आणून देऊन जिल्हा कौन्सिलच्या हातात शिक्षणाविषयक अधिकार ठेवले असता शिक्षणाची कशी वाढ हाते हे निदर्शनास आणून दिले. १९३६ साली मी (आबासाहेब) चार्ज घेण्यापूर्वी जिल्हा कौन्सिलच्या शाळातून शिकणाज्या विद्यार्थ्यांची संख्या २४ हजार होती. १९४१ साली राजीनामा देण्याच्या वेळी संख्या ३६ हजारापर्यंत वाढली''.५

''हरिजनांना मंदिर प्रवेशाची मोकळीक देणाज्या बिलाला आबासाहेबांनी पाठिंबा देऊन हे बील किती महत्त्वाचे आहे ते निदर्शनास आणून दिले. हजारो वर्षापासून आम्ही आमच्या अस्पृश्य समाजावर जो घोर अन्याय करीत आलो आहोत त्यांचे अंशत परिमार्जन करीत आहोत हे स्पष्ट केले''.६

''हिंदूस्थान स्वतंत्र झाल्यानंतर पहिल्या पुरवणी अंदाजपत्रकावर आबासाहेबांनी अनेक सूचना मांडून सरकारचे लक्ष वेधले. 'बेसिक शिक्षणाच्या गोंडस नावाखाली ज्या शाळा सरकार स्थानिक संस्थांच्या ताब्यातून काढून घेणार आहे त्याबाबत ते बोलले की, बेसिक शिक्षणाबाबत ज्या प्रकारे पुर्वतयारी करणे जरुरी आहे त्या प्रकारची पूर्वतयारी न करता जनतेचा पैसा खर्च करणे म्हणजे तो पैसा योग्यप्रकारे खर्च न करणे होय. त्यामुळे बेसिक शिक्षणाचा हेतू साध्य होणार नाही आणि जनतेचा पैसा वाया गेल्यासारखे होईल''.७

''खेड्यातील लोकांची पिण्याच्या पाण्याबाबत असलेल्या दुरावस्थेबाबत आबासाहेब बोलले की, पाण्याच्या समस्येमुळे लोकांचे हाल होतात. त्या तालुक्यासाठी पाणी

पुरविण्याची योजना आजच्या बजेटमध्ये कोठे आहे? सरकारने अशा ठिकाणच्या लोकांसाठी विहिरींची व्यवस्था तरी केली पाहिजे असे निदर्शनास आणून दिले''.८

''शेतकरी विषयक शिक्षणाबाबत आबासाहेब बोलले की शेतकी कॉलेजमध्ये अशाच विद्यार्थ्यांना प्रवेश दिला गेला पाहिजे की ज्यांच्या घरी स्वतची अशी शेती आहे. अशा विद्यार्थ्यांना प्रवेश दिला तर शेतकी कॉलेजमधून पास होवून बाहेर पडणाज्या विद्यार्थ्यांपैकी काही नोकरीच्या मागे लागतील आणि त्यापैकी बरेचसे लोक आपल्या शेतीवर जाऊन शेती करण्याच्या प्रयत्न करतील''९ असा त्यांचा दुरदृष्टीकोन होता.

आबासाहेबांनी ग्रामीण विकास क्षेत्राबाबत सभागृहामध्ये खालील प्रश्न व प्रस्ताव मांडले. ''७० टक्के लोक खेड्यात राहतात व ते शेतीवर अवलंबून आहे. त्यांना आम्ही ओलीताचे पाणी देवू शकलो पाहिजे त्यासाठी जास्त धरणे बांधली पाहिजे. तसेच पाणी अडविता येईल त्या–त्या त–हेने ते अडवून शेतकज्यांच्या जमिनीला दिले पाहिजे''.१०

**निष्कर्ष :–**

आबासाहेबांनी त्यांच्या बहुजनवादी लोककल्याणार्थ चाललेल्या राजकारणाचा पुरावा आहे. प्रश्न कितीही गुंतागुंतीचे असोत माहिती मिळविणे, वस्तुस्थिती टिपत जाणे, तक्रारींच्या अनुशंगाने सतत संपर्कात राहणे हे कार्य ते निरंतर करीत असे. त्यांनी जनतेच्या विश्वासाला तडा न जाऊ देण्यासाठी संघर्ष केला. जनसामान्यांच्या हितासाठी महत्त्वपूर्ण प्रश्नांवर सरकारचे लक्ष वेधले. हरिजनांना मंदिर प्रवेश मोकळीक देणाज्या बिलाला आबासाहेबांनी पाठिंबा देऊन हजारो वर्षापासून आम्ही आमच्या अस्पृश्य समाजावर जो घोर अन्याय करीत आलो आहोत ज्यांचे परिमार्जन करीत आहोत हे स्पष्ट केले. यावरून हे लक्षात येते की जननिष्ठा हे आबासाहेबांच्या नेतृत्त्वाचे सर्वाधिक नजरेत भरणारे वैशिष्ट्य दिसते.

**संदर्भसूची :–**

१) वीर उत्तमराव मोहिते – जागतिक कृषक क्रांतिचा विधाता, डॉ. पंजाबराव देशमुख

२) जनसेवक विशेषांक, ६ जून १९५८, वि. ना. उदासी

३) रविकिरण साने, लढा संयुक्त महाराष्ट्राचा

४) लालजी पेंडसे, महाराष्ट्राचे महामंथन

५) रा. रा. पराते (संपा.) – शेतकरी जुन २००० डॉ. आबासाहेब खेडकर स्मृती विशेषांक

६) रा. मु. देवके, विविध दर्शन

**संदर्भतळटिपा :–**

१) कोलाकर डॉ. रा. गो. विदर्भाचा आधुनिक इतिहास, ६००

२) कठारे डॉ. अनिल आधुनिक महाराष्ट्राचा इतिहास, ४६२

३) आबासाहेब उद्धृत, मातृभूमी दि. १६.६.४६, ३, प्रमिला ओक

४) आबासाहेब उद्धृत, मातृभूमी दि. २६.६.४६, ३, प्रमिला ओक

५) .. दि. १६.१०.४७, ३१

६) .. दि. २८.१०.४७, ५५

७) .. दि. ६.१०.४७, ३७

८) .. दि. ६.१०.४७,३७

९) .. दि. ६.३.४६,२६

१०) .... . १९६२, १७७०